**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
***Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com***
***UGC Approved Sr. No.45269, SEPT-OCT 2017, VOL- 4/36***

# हिंदू कोड बिल : डॉ. आंबेडकरांचा स्त्री—सुधारणावाद

**प्रा. सौ. विद्या संजय गायकवाड**

*सहाय्यक प्राध्यापक, इतिहास, इंदापुर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे.* vidyagaikwad2010@gmail.com

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

- **प्रस्तावना :—**

भारतीय समाजामधे सर्वाधिक शोषित घटक ही स्त्री राहिली आहे. भारतीय इतिहासाच्या विविध टप्प्यांमधून हे स्पष्ट झाले आहे. ऋग्वेदकाळामध्ये स्त्री—पुरुष समान मानले गेले होते. त्यांच्या अधिकाराची समान वाटणी केली होती. एवढेच नाही तर सत्ता, संपत्ती, शिक्षण आणि प्रतिष्ठा या सर्व बाबतीत स्त्री—पुरुष बरोबरी होती. मात्र वैदिक काळामध्ये हे चित्र पालटले. स्त्री—शुद्राचे अधिकार कमी केले गेले. केवळ सेवा देणे एवढेच त्यांचे कार्य उरले. अशा प्रकारची मिमांसा डॉ. आंबेडकरांनी केली आहे. वैदिक आणि बौद्धीक काळ वगळता स्त्रीच्या स्वातंत्र्याचा अधिकाधिक संकोच झाल्याचे डॉ. आंबेडकरांनी दाखवून दिले आहे. मात्र ब्रिटीश काळामध्ये स्त्री—शुद्राच्या किमान अधिकारांविषयी काही कायदे केले गेले. काही सुधारणांचे उपक्रम राबवले गेले. मात्र पुढे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्रीयांच्या स्वातंत्र्याचा विचार करून पुरुषांप्रमाणेच स्त्रीयांनाही अधिकार दिले. यासाठी डॉ. आंबेडकरांनी 'हिंदू कोड बिल' तयार केले. यामध्ये आंतरजातीय विवाह, एकपत्नीत्व, स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार, वारसा हक्क, दत्तक विधानास सुधारणा इत्यादि बाबींचा समावेश होता. मात्र हिंदू कोड बिलास संसदेत विरोध सुरू झाला. हिंदू कोड बिलाच्या विरोधात सर्वत्र आंदोलने सुरू झाली. डॉ. आंबेडकरांवर एकतर्फी टीका केली गेली. 'हिंदू कोड बिल' हे स्त्रियांच्या दृष्टिने महत्वाचे दिसून येते. स्त्रियांचे हक्क व अधिकार कायद्याने मिळावेत यासाठी डॉ. आंबेडकरांनी 'हिंदू कोड बिल' तयार केले.

- **हिंदू कोड बिल :—**

विसाच्या शतकात माँटेंग्यू—चेम्सफर्ड सुधारणांनंतर केंद्रात जे कायदेमंडळ निवडून आले त्यांनी पारंपारिक कायदे बदलून बाल विवाहाला प्रतिबंध करणारा कायदा व स्त्रियांना संपत्तीत वारसाचा अधिकार देणारा कायदा विधीमंडळात मंजूर करून घेतला. मात्र या कायद्याखालील खटले जेव्हा न्यायालयात आले तेव्हा निरनिराळ्या प्रांतातील न्यायाधिशांनी जे निकाल दिले त्यामध्ये खूप मोठी तफावत होती. त्यातून गोंधळ निर्माण झाला. तो नाहीसा करण्यासाठी हिंदूंच्या कायद्याच्या संहितेत बदल

करण्याची गरज वाटू लागली. त्यातूनच हिंदू कोड बिलाची निर्मिती झाली असे नलिनी पंडित म्हणतात.

डॉ. आंबेडकरांनी २१ ऑगस्ट १९४८ मध्ये 'हिंदू कोड बिल' मांडण्या अगोदर स्त्रियांच्या हक्कांसाठी विविध प्रकारचे १४ कायदे संमत करण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणे —

१. सतीप्रतिबंधक कायदा १८२८.
२. हिंदू विधवा पुनर्विवाहोत्तेजक कायदा १८५६.
३. धर्मांतरितांचा पुर्वीचा विवाह रद्द करणारा कायदा १८६०.
४. भारतीय तलाक कायदा १८६६.
५. ख्रिस्ती विवाह कायदा, १८७२.
६. विवाह नारी संपत्ती संरक्षक कायदा, १८७४.
७. लीगले प्रॅक्टिशनर ॲक्ट १९२३.
८. बालिका विविध प्रतिबंधक कायदा १९२६.
९. हिंदू उत्तराधिकार अधिनियम कायदा, १९२६.
१०. पारसी विवाह आणि तलाक कायदा १९३६.
११. हिंदू नारी संपत्ति अधिकार कायदा १९३६.
१२. प्रसुती अवस्थेत मिळावयाचे हक्क यासंबंधीचा कायदा, १९३६.
१३. हिंदू विजोड विवाह प्रतिबंध कायदा, १९४६.
१४. हिंदू विवाह वैधता कायदा, १९४६.

वरील विविध प्रकारच्या कायद्यांमध्ये एक वाक्यता असावी, परिस्थितीनुसार त्यात सुधारणा व्हावी म्हणून हिंदू कायद्याची संहिता तयार करण्याचा विचार मांडला गेला. म्हणून मध्यवर्ती सरकारने कलकत्ता हायकोर्टाचे न्यायाधीश सर बेनेगल नरसिंहराव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून प्रचलित कायद्याचा सूक्ष्म अभ्यास करून आपला अहवाल सादर केला. या कमिटीने जो अहवाल सादर केला त्याला सनातनी मंडळींनी विरोध केला. पुढे डॉ. आंबेडकर कायदामंत्री झाल्यानंतर हिंदू कोड बिलाचा अभ्यास करून आपले नवे 'हिंदू कोड बिल' १९४८ मध्ये तयार केले.

हे कोड बिल ९ भागात १३९ कलमांमध्ये व ७ परिशिष्टांमध्ये विभागले गेले होते. यात प्रामुख्याने आंतरजातीय विवाहास मान्यता, एकपत्नीत्वाचे बंधन, स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार, वारसा हक्क, मुलीला वडिलांच्या मालमत्तेवर अधिकार व दत्तक विधानात सुधारणा या गोष्टिंचा समावेश होतात. हा कायदा हिंदू धर्मातील सर्व घटकांना लागू होतात. या बिलातील ठळक तरतूदी पुढीलप्रमाणे :—

१. सख्खे भाऊ—बहिण, सावत्र भाऊ—बहिण व दूध भाऊ—बहिण यांचा विवाह त्याज्य ठरविला गेला.

२. नागरिक विवाहामध्ये

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

अ. कोणत्याही पक्षास लग्नाच्या वेळी दुसरा नवरा अगर बायको जीवंत नाही

ब. कोणताही पक्ष लग्नाचे वेळी जन्म वेडा अगर वेडा नाही

क. वराचे वय अठरा वर्ष पूर्ण झाले आहे व वधूचे वय १४ वर्षे पूर्ण झाले आहे

ड. दोन्ही पक्ष प्रतिबंध केलेल्या नात्याच्या पायऱ्यांमधील नाहीत

ई. दोन्ही पक्षाने जर त्याचे अगर तिचे वय २१ वर्षाचे पूर्ण झाले नसेल तर आपल्या लग्नासाठी पालकांची संमती मिळवलेली आहे.

अशा प्रकारची संमती आवश्यक असणार नाही.

३. विवाहाची नोंदणी होणे आवश्यक, लग्न कोणत्याही प्रकारे करता येईल पण लग्न साजरे होण्यासाठी दोन्ही पक्ष व तीन साक्षीदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोर स्वाक्षरी करतील.

४. पुरुषाप्रमाणे स्त्रियांनाही १८ वर्षाच्या मुलास दत्तक घेता येईल.

५. स्त्रीने मिळविलेल्या कोणत्याही मिळकतीवर तिचा पूर्ण मालकीचा हक्क होईल.

नलीनी पंडित यांनी कोडविषयी भाषा व यांतील क्रांतिकारी बदलांविषयी सविस्तर विवेचन केले आहे. या कायद्यामुळे विधिपूर्वक लावलेले लग्न व नोंदणी पद्धतीने केलेले लग्न हे लग्नांचे दोन प्रकार अधिकृत ठरले. विवाह प्रसंगी वराचे १८ हून जास्त व वधूचे १४ हून वय जास्त असावे. तसेच प्रथमच आंतरजातीय व सगोत्र विवाहांना मान्यता दिली गेली. पहिली पत्नी जीवंत असताना दुसरी पत्नी करण्यास विरोध होता. वधू, वरापैकी एकजण वेडा असेल तर विवाह बेकायदेशीर ठरविला गेला. याशिवाय खालील महत्वाच्या तरतूदी केल्या गेल्या.

**घटस्फोट :** हिंदू विवाह धार्मिक संस्कार मानला गेल्याने घटस्फोटाला परवानगी नव्हती. ती या कायद्यामुळे मिळणार होती.

**वारसा :** भारतामध्ये वारसासाठी दायभाग पद्धती अस्तित्वात होती. यामध्ये वारसाला मिळालेली मालमत्ता त्याच्या वैयक्तिक मालकीची असे व तिची विल्हेवाट लावण्याचा त्याला अधिकार असे. या हिंदू कोड बिलामुळे मुलींसाठी मुलाच्या हिश्श्याच्या अर्धा हिस्सा मिळणार होता. मिताक्षरा व दायभाग कायद्याप्रमाणे जर स्त्री वारसदार श्रीमंत अथवा गरिब विवाहित कि अविवाहित हे पाहून हिस्सा दिला जाईल. कोड बिलाने हा भेद काढून टाकला.

**पोटगी :** पोटगी संबंधी नवीन काही नव्हते. यामध्ये जर पत्नीला पोटगीचा अधिकार हवा असेल तर पत्नीवर विविध नियंत्रणे होती. मात्र कोड बिलानुसार पत्नी विविध कारणांसाठी त्यांच्या कडून पोटगी मागू शकत होती.

**दत्तक :** या कायद्यात दोन बदल होते – दत्तक घेण्याची परवानगी पत्नीकडून घेणे आवश्यक होती, विधवेला दत्तक घ्यायचा असेल तर नवऱ्याने तशी नोंद करून अथवा मृत्यूपत्र करून तिला परवानगी दिली पाहिजे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

हिंदू कोड बिलातील ८० % भाग निरनिराळ्या हिंदू धर्मशास्त्रावर आधारित होता. तर केवळ २०% नवीन सुधारणा केल्या होत्या.

हे बिल २४ फेब्रूवारी १९४९ रोजी सरकारकडून डॉ. आंबेडकरांनी मान्य केले . या बिलाला हिंदूंनी प्रखर विरोध केला. विरोधकांमध्ये पंडित मदनमोहन मालवीय, डॉ. राजेंद्र प्रसाद, वल्लभभाई पटेल, स्वामी करपात्री व शंकराचार्य यांचा विरोध होता.

या बिलाला अनेक समर्थक लाभले होते. यामध्ये पं. जवाहरलाल नेहरू, श्रीमती पद्मजा नायडू, डॉ. पा.वा. काणे, आचार्य कृपलानी, श्री. वि.स.खांडेकर इत्यादिंचा समावेश होता.

विरोध करणाऱ्यांचे असे मत होते की, या बिलामुळे हिंदूंची कुटुंब व्यवस्था नष्ट होईल. सनातन धर्म नष्ट होईल. भावा—बहिणीचे लग्न होईल, समाजात अनाचार माजेल अशा खोट्या गोष्टी पसरवून पुराणमतवाद्यांनी विरोध केला.

स्त्री प्रश्नांची सर्व बाजूंनी कायद्याने सोडवणूक करण्यासाठी तयार केलेले हिंदू कोड बिल पास होऊ शकले नाही. नेहरू मंत्रिमंडळ सनातन्यांसमोर झुकले. डॉ. आंबेडकरांनी कायदेमंत्री या पदाचा राजीनामा दिला. स्त्री प्रश्नासाठी मंत्रीपदाचा राजीनामा देणारे डॉ. आंबेडकर हे अद्वितीय समाजक्रांतिकारक होते.

डॉ. आंबेडकर म्हणाले होते : मी राज्यघटना निर्माण केली यापेक्षाही हिंदू कोड बिल माझ्या होतून झाले याचा आनंद होतो. हे कोड बिल म्हणजे एक तऱ्हेने पुरुष प्रधान स्त्री दास्यावर आधारलेला धर्म, संस्कृती व समाजाचे परंपरावादी रूप बदलणारे होते.

**संदर्भ :—**

*खैरमोडे चांगदेव भगवानराव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र', खंड तीन, पुणे. १९९०.*
*खैरमोडे चांगदेव भगवानराव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हिंदू कोड बिल' पुणे.*
*गणवीर रत्नाकर, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल' नागपूर २००४.*
*पंडित नलीनी, 'आंबेडकर', मुंबई, १९९९.*
*विमलकीर्ति , हिंदू कोड बिलासंबंधी डॉ. बी.आर.आंबेडकर, नागपूर १९८२.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*